# उल्हासनगर वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना


पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २३१ /२०२५      दि. ०८/१०/२०२५

## ''वाहतूक नियंत्रण अधिसूचना''

**ज्याअर्थी** उल्हासनगर वाहतूक उपविभागाचे कार्यक्षेत्रातील उल्हासनगर कॅम्प नं. २ मधील नेहरू चौक ते शिरू चौक, दरम्यान जपानी मार्केट, गजानन मार्केट असे कपडयाचे व इतर वस्तुचे होलसेल मार्केट असुन नेहरू चौक ते अमन रोड दरम्यान इलेक्ट्रीकल व फटाक्याचे होलसेल मार्केट आहे. सदर ठिकाणी दिवाळी सणानिमीत्त नागरिकांची खरेदी करण्यासाठी मोठया प्रमाणात गर्दी होत असते. सदर परिसरात वाहतुकीची प्रचंड कोंडी होवू नये व वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी**, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे:–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद :–** | १) अमन रोड कडुन नेहरू चौकाकडे जाणाऱ्या दुचाकी वगळुन बाकी सर्व प्रकारच्या वाहनांना **पटेल मार्ट चौक** येथे ''**प्रवेश बंद**'' करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग :–** | अमन रोड पटेल मार्ट कडुन नेहरू चौकाकडे जाणारी वाहने पटेल मार्ट येथे डावीकडे वळुन पुढे हिरा मॅरेज हॉल – मधुबन चौक मार्गे गोल मैदान मार्गे पुढे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद :–** | २) नेहरू चौकाकडुन शिरू चौकाकडे जाणाऱ्या दुचाकी वगळुन बाकी सर्व प्रकारच्या वाहनांना **नेहरू चौक** येथे ''**प्रवेश बंद**'' करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग :–** | नेहरू चौकाकडुन शिरू चौकाकडे जाणारी वाहने नेहरू चौकातुन पुढे देवीभवानी चौक–गोल मैदान–येथुन उल्हासनगर नं १ कडुन पुढे इच्छित स्थळी जातील. |
| **लोडीग अनलोडीग करिता प्रवेश बंद** | १) अमन रोड कडुन नेहरू चौकाकडे जाणाऱ्या रोडवर<br>२) नेहरू चौकाकडुन शिरू चौकाकडे जाणाऱ्या रोडवर **दुपारी १२.३० ते रात्री २४.०० वाजेपावेतो ''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे. |
| **लोडीग अनलोडीग करिता प्रवेश** | १) अमन रोड कडुन नेहरू चौकाकडे जाणाऱ्या रोडवर<br>२) नेहरू चौकाकडुन शिरू चौकाकडे जाणाऱ्या रोडवर **रात्री ००.०१ ते दुपारी १२.३० पर्यंत प्रवेश चालु राहील** |

सदरची अधिसुचना दिनांक १०/१०/२०२५ रोजी पासुन ते दि.२३/१०/२०२५ रोजी पर्यंत अंमलात राहील.

सदरची अधिसूचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील इतर वाहनांना लागू राहणार नाही.

( पंकज शिरसाट )<br>
पोलीस उप आयुक्त,<br>
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**

– मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– मा. आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका.
– मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर.
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.

– विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, विठ्ठलवाडी.
– नियंत्रण कक्ष, ठाणे/उल्हासनगर.
– ठाणे पोलीस पत्रक.

**प्रत** – पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदरची अधिसूचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– स.पो.आ. उल्हासनगर वाहतूक विभाग/पोनि उल्हासनगर वाहतूक उपविभाग.
२/– उल्हासनगर महानगरपालिकेच्या संबंधित अधिका–यांकडून आवश्यक सुचना फलके लावून घ्यावीत.